IIP
International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# मराठी कादंबरीतील : देवदासींच्या व्यथा व वेदना

**सरतापे वर्षा हुसेन**
**(एम.ए.) सेट**

**Article Info**

***Article History:***
Received: 26th Sep 2025
Accepted: 10th Oct 2025
Published: 25th Oct 2025

***Keywords:***
देवदासी प्रथा
मराठी कादंबरी
स्त्रीशोषण

**ABSTRACT**

राठी कादंबरी परंपरेने समाजातील सत्यस्थिती, सामाजिक अन्याय आणि मानवी दुःखाचे वास्तववादी चित्रण करण्याचे कार्य सातत्याने केले आहे. या परंपरेत देवदासी प्रथा हा एक अत्यंत ज्वलंत, वेदनादायी आणि सामाजिकदृष्ट्या महत्वाचा विषय राहिला आहे. देव, धर्म आणि रूढीपरंपरांच्या नावाखाली स्त्रीचे आयुष्य उद्ध्वस्त करणारी ही प्रथा मराठी कादंबऱ्यांमध्ये विविध अंगांनी उलगडली गेली आहे.

डॉ. राजन गवस यांच्या 'चौंडक' व 'भंडारभोग' तसेच उत्तम कांबळे यांच्या 'देवदासी आणि नग्न पूजा' या साहित्यकृतींमध्ये देवदासींचे सामाजिक स्थान, आर्थिक दारिद्र्य, मानसिक दडपण, लैंगिक शोषण, अपमान आणि जीवनातील असुरक्षितता यांचे अत्यंत वास्तववादी चित्रण दिसून येते. देवदासींच्या बालपणापासून त्यांच्या जगण्यातील भोगवस्तू बनण्यापर्यंतचा प्रवास लेखकांनी तितक्याच संवेदनशीलतेने उभा केला आहे.

या संशोधनात्मक लेखाचा उद्देश देवदासींच्या व्यथा-वेदना, त्यांच्या जीवनपरिस्थिती, समाजाकडून होणारी अवहेलना, चळवळींमुळे झालेली जागृती आणि कादंबरीकारांनी केलेले साहित्यिक सादरीकरण यांचा चिकित्सक अभ्यास करणे हा आहे. साहित्य आणि समाजातील नात्याच्या अनुषंगाने या कादंबऱ्या समाजातील अमानुष प्रथा, स्त्रीजीवनाची होरपळ आणि माणूसकीची झालेली हानी यांचे दाहक वास्तव अधोरेखित करतात. त्यामुळे देवदासींच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारे मराठी कादंबरीचे दालन हे एका सामाजिक दस्तऐवजाप्रमाणे महत्वाचे ठरते.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Oct 09, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Sartape, V. H. (2025). **मराठी कादंबरीतील : देवदासींच्या व्यथा व वेदना.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), 864–866.

**प्रस्तावना**

मराठी साहित्याचा प्रवाह अगदी अनादि काळापासून वाहत असलेला आपणांस दिसून येतो. या प्रवाहामध्ये कथा, कादंबरी, काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, लघु निबंध, नियतकालिका, प्रवास वर्णन ह्या अन् इतर साहित्य कलाकृतीचा समावेश होतो. तळागातील लोकांचे जीवन त्यांच्या व्यथा वेदना, अज्ञान, अंधश्रध्दा अशा एक ना अनेक गोष्टींचे चित्रण या प्रकारांमधून केले जाते.

मराठी साहित्यातील एक समृध्द दालन म्हणजे मराठी कादंबरीचे दालन होय. अथांग अशा मानवी जीवनातील सुख-दुःख टिपण्यासाठी, रेखाटण्यासाठी, वाचकांसमोर आणण्यासाठी, आपली व्यथा अगदी सविस्तरपणे मांडण्यासाठी कादंबरीसारखा विस्तृत पट हा कथा - काव्यापेक्षा अगदी योग्य असा ठरतो. सुख-दुःखाच्या अनेक गंभीर, महत्वाच्या ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम कादंबरीने केले आहे.

एखादा विषय कादंबरीच्या मार्फत योग्यरित्या वाचकांवर, त्यांच्या मनावर रूजवता येतो हे लक्षात आल्याच्यानंतर अनेक प्रतिभावंत साहित्यिकांनी हा वाडमय प्रकार यशस्वी पध्दतीने हाताळला. वाचकांनीही या वाड्:मय प्रकारातील पहिली पसंती दिली. कादंबरी या वाङ् मय प्रकाराला पुष्कळदा 'आधुनिक युगाचे महाकाव्य' असे म्हटले जाते. एक 'सामाजिक दस्तऐवज' म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. अभिव्यक्तीसाठी सर्वात उत्तम प्रकार म्हणजे कादंबरी होय. लेखक भालचंद्र नेमाडे यांनी तर कादंबरीच्या धमन्या रूंद असतात असे म्हटले आहे. मराठीत कादंबरी या वाङ् मय प्रकाराचा उदय इंग्रजी वाड्:मयाच्या अनुकरणातून झाला. तसेच या वाङ् मय प्रकाराचा उल्लेख इंग्रजीमध्ये 'नावल' हा त्यासाठी पर्यायी शब्द वापरण्याचा प्रयत्न झाला. पण तो रूढ झाला नाही. बाणभट्टाची 'कादंबरी' हाच शब्द पुढे प्रचलित झाला.

कादंबरीच्या माध्यमातून अनेक ज्वलंत अशा प्रश्नांना हात घालण्यात येतो. अनेक सामाजिक विषयांचा यामध्ये योग्यरित्या उहापोह केला जातो. असाच एक ज्वलंत आणि सामाजिकदृष्टया महत्व असलेला विषय म्हणजे 'देवदासी' होय. 'देवदासी' हा अत्यंत महत्वाचा विषय अनेक कथा, कादंबरीतून चित्रित झाला आहे. आपल्या समाजातील देव, धर्म, अनिष्ट, रूढी परंपराचा बळी म्हणजे देवदासी होय. 'जोगतीण देवाची, मालकी गावाची' ही आपल्या बोलीतील म्हण तिच्या जीवनाच, तिच्या जगण्याचं सार सांगून जाते. ह्या म्हणीमध्ये तिच्यावर असलेल्या प्रासंगाचे गांभीर्य आपल्या लक्षात आल्याशिवाय राहत नाही. देवदासी ही प्रथा खूप दिवसांपासून आपल्या समाजात रूजलेली दिसून येते. देवदासी प्रथा बंद करण्यासाठी शासनाने कायदे केले, पण ते सर्वच पुस्तकात अडकून पडले. प्रथा बंद करण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे काम, धाडस सरकारने केलं नाही. सामाजिक सुधारणेचा झेंडा हातात घेतलेल्या व्यक्तीनीच ह्या प्रथेकडे डोळस वृत्तीने पाहणे ही आज खरे तर काळाची गरज आहे. महिला मुक्तीसाठी प्रयत्न करणाऱ्यांनी, सामाजिक वसा हाती घेतलेल्या समाजसुधारकांनी तसेच कार्यकर्त्यांनी एकत्र येवूनच या प्रथेला सुरूंग लावण्याची खरी गरज आहे.

लेखक वाचकांसमोर अगदी यथार्थपणे उलगडीत करत असतो. आजसुध्दा आपला भारत देश विज्ञानाकडे - विकासाकडे वाटचाल करत असताना दुसरीकडे अशा अघोरी, जीवघेण्या, अनिष्ठ प्रथेमध्ये काही समाज व्यस्त असलेला दिसून येतो. देवदासी म्हणजे देवाची दासी, देवाची पत्नी. देवाची सेवा करणे, हे तिचं काम, देव सर्वांचा असतो म्हणून देवदासीही सर्वांची या न्यायाने या देवदासीला समाजाने केवळ आणि केवळ एक भोगदासी बनविले आणि तिची फक्त भोगवस्तू बनवून मानसिक त्रास द्यायचा ही समाजाने ठरविलेली देवदासी अनेकांच्या वासनेचा शिकार बनली. समाजातील राक्षसी प्रवृत्तीच्या अनेक राक्षसांनी देवा-धर्माचा आधार घेऊन तिचा भोग घेतला. काहींनी सामाजिक सत्तेच्या जोरावर तिच्यावर जबरदस्ती करून तिचा उपभोग घेतला. देवदासी म्हणजे ज्या मुलींचे लग्न देवीबरोबर लावली जातात. त्यांनी आयुष्यभर देवीची सेवा करत फक्त दासी म्हणून राहायचे आणि आपला उदरनिर्वाह जोगवा मागून करायचा. जोगवा मागताना तिने कोणतीही लाज बाळगायची नाही तसेच ती लोकांच्या चेष्टेचा विषय बनते. त्याकडे ही दुर्लक्ष करत तिने आपली उपजिवीका रडत-खडत जगायचे. गावातील अनेक

व्यक्तीच्याकडून अपमान, गलिच्छ शब्द काळजावरती झेलायचे आणि पचवायचे कथित देवाच्या नावानं जगणारी ही देवदासी अनेकांच्या वासनेचा शिकार बनली. अत्याचार, त्यांची होरपळ, त्यांची मानसिकता इ. 'चौंडक' आणि 'भंडारभोंग' मधून देवदासीचा प्रश्न हाताळला आहे. देवदासी म्हणून यल्लमा देवीला सोडलेल्या मुलींची कशी भोगवस्तू होण्याची प्रक्रिया व त्यामुळे उद्ध्वस्त झालेले जीवन तिची आणि तिच्या कुटूंबियांची झालेली ससेहोलपट हा विषय इथे केंद्रस्थानी आहे. त्याचबरोबर 'भंडारभोग' या कादंबरीमध्ये डॉ.राजन गवस यांनी उपेक्षित अशा जोगत्याचे आयुष्य चितारलेले आहे. जोगत्याची भटकंती, त्याला धारण करावा लागणारा स्त्रीवेष, सर्वसामान्य जीवनाचा त्याग करून त्याला जगावे लागणारे तिरस्कृत आयुष्य हा पारंपारिक धर्म समजुतीमुळे एकूणच माणूसकीची होणारी हेळसांड त्यातून निर्माण होणारे दुःख, एकूणच देवदासीचे चित्र मन सुन्न करते.

'चौंडकं' ह्या कलाकृतीमधून डॉ. राजन गवस यांनी स्त्रीच्या दुःखाचा नेमका वेध घेतला आहे. बोलीची सर्व सामर्थ्य पचवून राजन गवस यांनी 'चौंडकं' मध्ये घेतला आहे. 'सुली'च्या बालपणीची सुली आणि मोठेपणीची सुली कादंबरी वाचताना आपोआप डोळयासमोर तिचे व्यक्तिमत्व उभं राहतं, सुलीची आई बायजा किंवा जोगतीण शेवंताक्का या व्यक्तिरेखा हुबेहूब डोळयासमोर उभा राहतात. 'सुली' च्या व्यक्तीरेखेतून एक ठसठसीत वेदना आपल्यासमोर आल्याशिवाय राहत नाही.

चौंडक्याच्या आवाजात स्वतःच्या व्यथा-वेदना, दडपशाही, अत्याचार, अपमान, अवहेलना दडवत-लपवत राहिल्या. 'देवदासी' ही भयानक प्रथा आजही समाजामध्ये स्थिर असल्याचे पहावयास मिळते, ही प्रथा आजसुध्दा कर्नाटक सीमाभाग, कोल्हापूरसारख्या ठिकाणी चालू आहे. त्यामुळे आजही देवदासी हा विषय गंभीर जाणवतो.

देवदासींच्या वाट्याला येणारे जीवन, त्यांचे सामाजिक स्थान, त्यांची सामजिक, आर्थिक स्थिती, समाजात होणारी अवहेलना, त्यांचे कुटूंबातील स्थान, मुलांचा प्रश्न, चळवळीच्या माध्यमातून त्यांच्याकडे झालेली जागृती या सर्व गोष्टींचा अभ्यास अनेक कादंबरीच्या माध्यमातून लेखक वाचकांसमोर योग्यरित्या प्रतिपादित करीत असतो.

साहित्य व समाज यांचे नाते अतुट असे मानले जाते किंबहुना साहित्यकृती ही समाजाचा आरसा मानले जाते. समाजातील दुःखाचा, अनिष्ट रूढी-परंपरेचा ज्वलंत प्रश्नांचा शोध घेणे साहित्याचे आद्य कर्तव्यच मानले जाते. देवदासी प्रथेमुळे उद्ध्वस्त होणारे अमूल्य स्त्रीजीवन ग्रामीण भागातील गुंडगिरी व अरेरावी देवदासी स्त्रीयांवर होणारे अत्यंत 'चौंडक' मधून राजन गवस यांनी देवदासीच्या जगण्यासाठी सर्व दुःख उहापोह करणारी त्याचप्रमाणे देवदासींच्या समस्यांचा वेध घेणारी कादंबरी म्हणून ह्या कादंबरीची अग्रक्रमाने नोंद घेतल्यास त्यात वावगे असे काही ठरणार नाही.

*** संदर्भ ग्रंथ-**

१) चौंडक - डॉ. राजन गवस
(मेहता पब्लिशिंग हाऊस)
२) भंडारभोग - डॉ. राजन गवस
(मेहता पब्लिशिंग हाऊस)*
३) देवदासी आणि नग्न पुजा - उत्तम कांबळे
(प्रकाश विश्वासराव लोकवाङ्:मयगृह, मुंबई)